शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे-१
१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१
दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.comवेब साईट- WWW.dydepune.com

# इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७

## जाहीर प्रकटन

**दिनांक २२.०७.२०१६.**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्रमांक-१२७/२०१४ च्या अंतरिम आदेशानुसार व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय दि.२८.०३.२०१६ नुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वीचे प्रवेश फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात यावेत असे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन पध्दतीने प्रवेश होणार नाहीत हे पुन्हा ठळकपणे या प्रकटनाद्वारे जाहीर करण्यात येत आहे.

ऑनलाईन अर्ज केलेल्या ७३,९६१ विद्यार्थ्यापैकी केवळ १४२ विद्यार्थ्यांना चौथ्या फेरी अखेर सदर विद्यार्थ्यांचे पसंतीक्रम व गुण जुळत नसल्यामुळे ॲलॉटमेंट करता आलेली नाही. तसेच७३,८१९ विद्यार्थ्यांना ॲलोकेशन केलेले आहे. प्रत्यक्षात ५२,२४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.

शासनाचे पत्र दि.२१.०७.२०१६ मध्ये खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१. कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात ऑफलाईन प्रवेश दिला जाणार नाही याची महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी. ऑफलाईन पध्दतीने प्रवेश दिल्याचे आढळल्यास अशा विद्यार्थ्यास इ. १२ वी च्या बोर्ड परीक्षेस बसण्यास अपात्र ठरविण्यात येईल. राज्य मंडळास इ.११ वी मध्ये ऑनलाईन पध्दतीने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा डेटा शेअर करण्यात येईल. तसेच इ.११ वी व १२ वी ची पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांची संचमान्यता ऑनलाईन पध्दतीने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश संख्येवरच अवलंबुन राहणार असल्याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

२. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबद्दलचा शासन निर्णय मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या संमतीने निर्गमित केलेला असुन ऑफलाईन पध्दतीने प्रवेश झाल्यास तो मा. उच्च न्यायालयाचा अवमान ठरेल. त्यामुळे ऑफलाईन पध्दतीने प्रवेश घेतल्यास ते प्रवेश बेकायदेशीर समजले जातील व याबद्दलची संपुर्ण जबाबदारी ही त्या विद्यार्थ्यांची, पालकांची व संबधित कनिष्ठ महाविद्यालयांची राहील, तसेच ऑफलाईन प्रवेश आढळल्यास तो मा. उच्च न्यायालयाचा अवमान समजून कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यां वर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शासनाचे दि.२१.०७.२०१६ च्या पत्रानुसार उर्वरित विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन फे-यांचे आयोजनकरण्यात आलेले आहे. त्याची कार्यपध्दती व वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

**ऑनलाईन प्रवेश फेरीची कार्यपध्दती व वेळापत्रक**

| अ.क्र. | बाब | दिनांक |
|---|---|---|
| १ | ॲलॉट करुनही प्रवेश न घेतलेले (Not Reported) विद्यार्थ्यांनी पुन्हा कॉलेज ॲलॉट झाल्याचा संदेश वेबसाईटच्या होमपेजवर ऑनलाईन फॉर्मनंबर टाकून पाहणे. | २७ जुलै २०१६. सायंकाळी ५.०० वाजता |

| अ.क्र. | बाब | दिनांक |
|---|---|---|
| २ | ॲलॉट झालेल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांने प्रवेश घेणे व महाविद्यालयाने संबधित विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाईन अपडेट करणे. | २८ जुलै २०१६. (वेळ स.११ ते ४) दि.२९ जुलै २०१६ (वेळ स. १० ते १२) |
| ३ | ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले नाहीत, अर्धवट अर्ज भरले आहेत, तसेच चारही फे-यामध्ये ॲलोकशन न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पाचव्या ऑनलाईन फेरीचे आयोजन करणे. | सविस्तर कार्यपध्दती दि.२९ जुलै २०१६ रोजी प्रसिध्द् करण्यात येईल. |
| | अ) प्रवेश अर्ज सादर करणे (फक्त नवीन विद्यार्थ्यांने प्रवेश अर्ज सादर करणे, अर्धवट अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांने भाग-१ व भाग-२ पूर्ण करुन ऑनलाईन सबमिट करणे.) | ३० जुलै २०१६ ते ०२ ऑगस्ट २०१६ |
| | ब) गुणवत्ता यादी जाहीर करणे. | ०४ ऑगस्ट २०१६ |
| | क) संबधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे. | ५,६ ऑगस्ट २०१६ |
| ४ | ज्या विद्यार्थ्यांना दूरचे महाविद्यालयात मिळालेले आहे, शाखा/माध्यम चुकीचे निवडले आहे, शाखा बदल करावयाचा आहे, प्राधान्यक्रम चुकला आहे, जुलै २०१६ मध्ये झालेल्या इ.१० वी च्या पुरवणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यांच्यासाठी विशेष ऑनलाईन फेरीचे आयोजन करणे (याकरिता नव्याने नोंदणी व नव्याने फी भरणे आवश्यक) | सविस्तर कार्यपध्दती दि.०७ ऑगस्ट २०१६ रोजी प्रसिध्द् करण्यात येईल. |
| | अ) पहिली विशेष फेरी | ०९ ते १३ ऑगस्ट २०१६ |
| | ब) दुसरी विशेष फेरी | १८ ते २३ ऑगस्ट २०१६ |
| | क) तिसरी विशेष फेरी | २५ ते ३० ऑगस्ट २०१६ |

✧(विशेष फेरीमध्ये ॲलॉटमेंट झाल्याशिवाय विद्यार्थ्यांने आधीचा प्रवेश रद्द करु नये.)

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१